# बृहन्मुंबई महानगरपालिका (शिक्षण विभाग)

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी मुंबई पब्लिक स्कूल (सीबीएसई/ आयसीएसई / आयजीसीएसई / आयबी) मंडळाच्या शाळेतील प्रवेश प्रक्रियेबाबत पालकांसाठी आवश्यक सूचना.**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत मुंबई पब्लिक स्कूल सीबीएसई/आयसीएसई/आयजीसीएसई व आयबी मंडळ अभ्यासक्रमाच्या शाळांमध्ये प्रतिवर्षी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असते. या अनुषंगाने सद्यस्थितीत सुरू असणा-या १८ सीबीएसई व आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी ०१ अशा एकूण २१ शाळांमध्ये नर्सरीच्या वर्गाकरीता मान. महापौर यांच्या शिफारसीच्या १०% व मनपा कर्मचारी यांच्या ५ % राखीव असणा-या जागा वगळून उर्वरित जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया दिनांक ०१/०१/२०२५ पासून १५/०१/२०२५ पर्यंतच्या कालावधीत खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.**

प्रथम टप्पा-: प्रवेश अर्ज भरणे

**फक्त संगणकीय प्रणालीद्वारे प्रवेश अर्ज स्विकारण्यात येतील. संगणकीय सुविधा उपलब्ध नसणाऱ्या अर्जदारांसाठी संबंधीत शाळांमध्ये मदत कक्ष स्थापन करण्यात येतील. दिनांक ०१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० सोमवार ते शनिवार या वेळेत संबंधित शाळेच्या मदत कक्षात ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता मदतीसाठी शालेय कर्मचारी उपलब्ध असतील. प्रवेशासाठी शाळा खालीलप्रमाणे आहेत सोबत रिक्त जागांचा तपशिल तक्ता "अ" मध्ये देण्यात आला आहे.**

| अ.क्र | शाळेचे नाव | मंडळ | विभाग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई पब्लिक स्कूल चिकूवाडी,बोरीवली | सीबीएसई | आर मध्य | २०२१-२२ |
| २ | मुंबई पब्लिक स्कूल पूनम नगर , अंधेरी(पूर्व) | सीबीएसई | के पूर्व | २०२०-२१ |
| ३ | मुंबई पब्लिक स्कूल वूलन मिल, माहीम | आयसीएसई | जी उत्तर | २०२०-२१ |
| ४ | मुंबई पब्लिक स्कूल जनकल्याण नगर ,मालाड | सीबीएसई | पी उत्तर | २०२१-२२ |
| ५ | मुंबई पब्लिक स्कूल प्रतीक्षा नगर, जोगेश्वरी | सीबीएसई | के पश्चिम | २०२१-२२ |
| ६ | मुंबई पब्लिक स्कूल मीठागर, मुलुंड | सीबीएसई | टी | २०२१-२२ |
| ७ | मुंबई पब्लिक स्कूल हरियाली विलेज, विक्रोळी | सीबीएसई | एस | २०२१-२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मुंबई पब्लिक स्कूल राजावाडी, घाटकोपर | सीबीएसई | एन | २०२१-२२ |
| ९ | मुंबई पब्लिक स्कूल अजिज बाग, चेंबूर | सीबीएसई | एम पूर्व २ | २०२१-२२ |
| १० | मुंबई पब्लिक स्कूल तुंगा विलेज, पवई | सीबीएसई | एल | २०२१-२२ |
| ११ | मुंबई पब्लिक स्कूल भवानी शंकर,दादर | सीबीएसई | जी उत्तर | २०२१-२२ |
| १२ | मुंबई पब्लिक स्कूल काणे नगर, सायन | सीबीएसई | एफ उत्तर | २०२१-२२ |
| १३. | मुंबई पब्लिक स्कूल एल.के,वाघजी ,माटुंगा | केंब्रिज | एफ उत्तर | २०२२-२३ |
| १४. | मुंबई पब्लिक स्कूल विलेपार्ले. (पूर्व) | आयबी | के पूर्व | २०२२-२३ |
| १५. | मुंबई पब्लिक स्कूल जिजामाता नगर | सीबीएसई | एम/प | २०२३-२४ |
| १६ | मुंबई पब्लिक स्कूल आशिष तलाव(वडवली) | सीबीएसई | एम/पूर्व-२ | २०२३-२४ |
| १७ | मुंबई पब्लिक स्कूल एम.जी क्रॉस रोड क्र.१ | सीबीएसई | आर/द | २०२३-२४ |
| १८ | मुंबई पब्लिक स्कूल शांती नगर | सीबीएसई | जी/द | २०२४-२५ |
| १९ | मुंबई पब्लिक स्कूल नटवर पारेख कंपाऊंड(गोवंडी) | सीबीएसई | एम/ई-१ | २०२४-२५ |
| २० | मुंबई पब्लिक स्कूल मालवणी टाऊनशिप,मालाड | सीबीएसई | पी/उत्तर | २०२४-२५ |
| २१ | मुंबई पब्लिक स्कूल वीर सावरकर मार्ग वर्षा नगर | सीबीएसई | एस | २०२४-२५ |

## द्वितीय टप्पा -:अर्ज छाननी

**स्विकृत अर्जाच्या यादीतील पाल्यांच्या पालकांना कागदपत्रे छाननी आणि समुपदेशन सत्रासाठी शाळेत बोलाविण्यात येईल. छाननी प्रक्रियेसाठी पालकांनी खालील कागदपत्रांच्या मूळ प्रती घेऊन शाळेत हजर राहणे आवश्यक राहील.**

१) **पालकांचे आधार कार्ड**

२) **पाल्याचे जन्म प्रमाणपत्र**

३) **सध्याच्या निवासी पत्याचा पुरावा (आधारकार्डपेक्षा वेगळा पत्ता असल्यास)**

## तृतीय टप्पा -: सोडत

**सीबीएसई व आयसीएसई मंडळाच्या शाळेत जर नर्सरी वर्गाच्या एका तुकडीसाठी ३४ पेक्षा जास्त विद्यार्थांचे प्रवेश अर्ज प्राप्त झाले तर विद्यार्थाची निवड प्रक्रिया सोडती (लॉटरी) द्वारे करण्यात येईल. सोडतीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्याची गरज भासल्यास त्याचे वेळापत्रक छाननी**

**प्रक्रीयेनंतर जाहीर करण्यात येईल.**

**आयबी व आयजीसीएसई मंडळाच्या शाळेत जर नर्सरी वर्गाच्या एका तुकडीसाठी २६ पेक्षा जास्त विद्यार्थांचे प्रवेश अर्ज प्राप्त झाले तर विद्यार्थांची निवड प्रक्रिया सोडती (लॉटरी) द्वारे करण्यात येईल. सोडतीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्याची गरज भासल्यास त्याचे वेळापत्रक छाननी प्रक्रीयेनंतर जाहीर करण्यात येईल.**

चतुर्थ टप्पा :- प्रवेश निश्चिती

**तृतीय टप्पा पूर्ण झाल्यानंतर अंतिम निवड यादी संबंधित शाळांमध्ये प्रदर्शित करण्यात येईल.प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित पालकांना शाळेत उपस्थित रहावे लागेल.त्याबाबतचे वेळापत्रक सबंधित शाळेद्वारे कळविण्यात येईल.**

प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक

| प्रक्रिया | प्रारंभ तारीख | समाप्ती तारीख |
|---|---|---|
| ऑनलाईन अर्ज प्रक्रिया | ०१.०१.२०२५ | १५.०१.२०२५ |
| प्राथमिक कागदपत्र छाननी आणि पालकांचे समुपदेशन सत्र | १०.०१.२०२५ | २२.०१.२०२५ |
| सोडत प्रक्रियेसाठी पात्र पाल्यांची यादी प्रदर्शित करणे. | २७.०१.२०२५ | |
| सोडत प्रक्रिया | ०३.०२.२०२५ ते ०६.०२.२०२५ | |
| निवड झालेल्या पाल्यांची यादी प्रदर्शित करणे. | ०८.०२.२०२५ | |
| निवड झालेल्या पाल्यांची प्रवेश नोंद प्रक्रिया | १०.०२.२०२५ ते २८.०२.२०२५ | |
| शैक्षणिक सत्राची सुरुवात | एप्रिल २०२५ | |

<u>प्रवेशाच्या सर्वसाधारण सूचना</u>

१) **प्रत्येक टप्प्यावर त्या टप्प्यात निवडलेल्या पाल्यांची यादी शाळेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल आणि तीच यादी शाळा –निहाय आणि वर्ग निहाय व्हॉट्सॲप ग्रुपवर पालकांना पाठविण्यात येईल.याबाबत नोंद घेण्याचीसंपूर्ण जबाबदारी पालकाची असेल.**

२) **शाळेपासून ०१ किलोमीटर परिक्षेत्रात राहणा-या विद्यार्थांना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य दिले जाईल.**

३) **नविन शैक्षणिक वर्ष एप्रिल २०२५ पासून सुरू होईल.**

४) **सीबीएसई/आयसीएसई/आयजीसिएसई/आयबी मंडळाशी संलग्न असणाऱ्या सगळ्या "मुंबई पब्लिक स्कूल" शाळेमध्ये मराठी विषय हा तृतीय भाषा म्हणून बंधनकारक राहील.**

५) **शासन निर्णय क्र.प्राशिसं/आरटीई/-८०१/२०२४/१४६२ दि.२२/०२/२०२४ अनुसार निर्देशित केल्याप्रमाणे वयोमर्यादेचे निकष बंधनकारक राहतील.**

| इयत्ता | किमान जन्मदिनांक | कमाल जन्मदिनांक | दिनांक ३१.१२.२०२५ रोजीचे किमान वय | दिनांक ३१.१२.२०२५ रोजीचे कमाल वय |
|---|---|---|---|---|
| **नर्सरी** | **०१/०७/२०२१** | **३१/१२/२०२२** | **३ वर्षे** | **४ वर्ष ५ महीने ३० दिवस** |